रात्रीच्या प्रखर उजेडामुळे हृदयविकाराचा धोका

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : रात्री प्रखर उजेडात राहणे, फोनचा अति वापर करणे (स्क्रोलिंग) यासारख्या कृतींमुळे हृदयविकाराचा धोका ५६ टक्क्यांनी वाढू शकतो, असे एका नव्या अभ्यासात आढळले आहे. ४० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या प्रौढांमध्ये हे हृदयरोगासाठी एक महत्त्वाचे धोक्याचे कारण ठरू शकते, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

ऑस्ट्रेलियातील फ्लिंडर्स विद्यापीठातील संशोधकांच्या नेतृत्वाखालील पथकाने इंग्लंडमधील सुमारे ८९ हजार लोकांनी मनगटावर परिधान केलेल्या सेन्सरमधून जमलेली १.३ कोटी तासांच्या 'प्रकाशसंपर्का'ची (लाइट एक्स्पोजर) माहिती विश्लेषित केली. सहभागींचे नऊ वर्षांहून अधिक काळ निरीक्षण करण्यात आले.

रात्रीच्या प्रकाशाच्या संपर्कामुळे हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका ४७ टक्क्यांनी, हृदयाच्या रक्तवाहिन्यांच्या आजाराचा धोका ३२ टक्क्यांनी आणि पक्षाघाताचा धोका २८ टक्क्यांनी जास्त असल्याचेही दिसून आले.

'जर्नल ऑफ द अमेरिकन मेडिकल असोसिएशन नेटवर्क ओपन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखात अभ्यासाचे प्रमुख लेखक आणि फ्लिंडर्स विद्यापीठातील संशोधन सहयोगी डॅनियल विंड्रेड यांनी सांगितले की, रात्रीच्या प्रकाशाच्या संपर्कामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो, हे दाखवणारा हा पहिलाच मोठा अभ्यास आहे.

रात्री जेव्हा नैसर्गिकरीत्या अंधार असायला हवा, तेव्हा सतत तेजस्वी प्रकाशात राहिल्यामुळे शरीराची अंतर्गत जैविक घड्याळे (सर्केडियन क्लॉक) विस्कळीत होतात आणि त्यामुळे गंभीर हृदयविकार होण्याचा धोका वाढतो, असेही विंड्रेड म्हणाले.

मूळ घटनेत उल्लेख नसलेल्या सल्लागारपदी चार माजी पदाधिकारी कार्यरत

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : कुसुमाग्रज प्रतिष्ठान संस्था स्थापन करताना न्यासाच्या उद्देश पूर्तीसाठी कार्य करता यावे म्हणून विश्वस्त मंडळाला सर्वाधिकार देण्यात आले. कुठल्याही विश्वस्ताची मुदत दहा वर्षांपेक्षा अधिक असणार नाही, असाही मूळ घटनेत उल्लेख आहे. त्यामध्ये सल्लागार असे कोणतेही पद नसताना सद्यःस्थितीत संस्थेत चार व्यक्ती या पदावर कार्यरत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

कार्यवाह सुरेश भटेवरा यांच्या राजीनाम्यामुळे प्रतिष्ठानचा कारभार चर्चेत आला आहे. प्रतिष्ठानमध्ये संबंधितांना सल्लागार करताना संस्थेने घटनेत दुरुस्ती केली की, घटना बाजुला ठेवत नियुक्ती केली, याबद्दल साशंकता व्यक्त होत आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष वसंत डहाके यांनी या संदर्भात माहिती घेऊन भाष्य करणे योग्य ठरेल, असे नमूद केले. तीन नवीन विश्वस्त निवड प्रक्रियेतील घटनाक्रमातून कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा कारभार एकचालकानुवर्ती बनल्याची भावना प्रबळ झाली आहे. एक सल्लागार आणि दोन विश्वस्तांच्या विरोधामुळे अंतिम टप्प्यातील प्रक्रियेला खीळ बसली. या प्रक्रियेवर अविश्वास दाखविला गेल्याने कार्यवाह भटेवरा हे राजीनामा देऊन बाहेर पडल्याचे बोलले जाते. प्रतिष्ठानच्या कारभारावर विश्वस्त मंडळांऐवजी सल्लागारांचा प्रभाव असून तेच ही संस्था चालवत असल्याची चर्चाही साहित्य वर्तुळात होत आहे.

घटनेत काय?

- जानेवारी १९९० मध्ये कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक हा न्यास स्थापन झाला. कविश्रेष्ठ वि. वा. शिरवाडकर यांना अभिप्रेत सांस्कृतिक व सामाजिक कार्य करण्यासाठी संस्थेत किमान ११ किंवा कमाल १५ सदस्यांचे विश्वस्त मंडळ असेल, असे मूळ घटनेत नमूद आहे.
- निवृत्त विश्वस्तही फेरनिवडीस पात्र राहतील, मात्र अशा कोणत्याही विश्वस्तांची मुदत १० वर्षांपेक्षा अधिक असणार नाही. न्यासाच्या उद्देशपूर्तीसाठी विश्वस्त मंडळात सर्वाधिकारी असतील असे नमूद आहे.
- घटनेत अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह, खजिनदार या पदांचा उल्लेख आहे. परंतु, सल्लागार या पदाचा कुठेही उल्लेख नाही.
- संस्थेचे माजी कार्यवाह सध्या सल्लागार झाले असून एकाच वेळी विलास लोणारी, हेमंत टकले, लोकेश शेवडे आणि मकरंद हिंगणे असे चार माजी पदाधिकारी सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. घटना दुरुस्तीने ही पदे निर्माण झाली की नाही, याबद्दल अस्पष्टता आहे.

संस्थेच्या घटनेत सल्लागार हे पद आहे की नाही, यावर आपणास माहिती घ्यावी लागेल. त्यामुळे आता त्यावर बोलणे योग्य नाही. कार्यवाह सुरेश भटेवरा यांचा राजीनामा, नवीन विश्वस्तांची निवड या सध्याच्या विषयांवर लवकरच बैठक घेऊन सर्व प्रश्नांचा उहापोह केला जाईल.
- वसंत आबाजी डहाके, अध्यक्ष, कुसुमाग्रज प्रतिष्ठान

जळगावमध्ये भरीताची वांगी १०० रुपये किलो

प्रतिकूल हवामानामुळे उत्पादनात घट

लोकसत्ता प्रतिनिधी

जळगाव : दिवाळीत थंडीची चाहूल लागताच बाजारात भरीताची वांगी मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येऊ लागतात. घरोघरी भरीत-पुरीचा बेतही आखला जातो. शेतांमध्येही भरीत पार्ट्या रंगू लागतात. हे चित्र यंदा दिसणे कठीण झाले आहे. प्रतिकूल हवामानामुळे उत्पादन घटल्याने सध्या भरीताच्या वांग्यांचा दर १०० रूपये किलोपर्यंत पोहचला आहे.

जिल्ह्यातील यावल, रावेर, मुक्ताईनगर, भुसावळ, जामनेर, पाचोरा आणि जळगाव तालुक्यांत प्रामुख्याने भरीताच्या वांग्याचे उत्पादन घेतले जाते. सप्टेंबर महिन्यातील सततच्या ढगाळ हवामानासह अतिपावसाने मोठ्या प्रमाणात फुलगळ झाल्याने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरले. सध्या बाजारात जेवढी काही वांगी विक्रीसाठी येत आहेत, ती उन्हाळी लागवडीची आहेत. त्यांना दिवाळीत १६० रुपयांचा भाव मिळाला. आताही बाजारात ही वांग १०० रुपयांपर्यंत विकली जात आहेत. गेल्या वर्षी याच दिवसावर भरिताच्या वांग्यांना ६० रुपये किलोचा भाव होता.

खवय्ये नाराज

भरीत वांग्यांचे दर उंचावल्याने खवय्ये नाराज झाले आहेत. जळगावातील विविध हॉटेलांमध्ये मिळणाऱ्या भरीत दरातही १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी २०० ते २४० रुपये किलोप्रमाणे मिळणारे भरीत आता २५० ते २८० रुपये किलो दराने विकले जात आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही एक एकरावर जून महिन्यात भरीत वांग्याच्या रोपांची लागवड केली होती. त्यापासून दिवाळीच्या तोंडावर उत्पादन सुरू होण्याची अपेक्षा असताना, दिवाळी आटोपली तरी अद्याप एकही वांगे निघालेले नाही.
-रवींद्र महाजन, शेतकरी, आसोदा, जळगाव

यात्रेत गेलेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

मारेगाव तालुक्यातील धक्कादायक घटना

लोकसत्ता वार्ताहर

यवतमाळ : मारेगाव तालुक्यात प्रसिद्ध असलेल्या पांढरदेवी येथे बुधवारी सायंकाळी गायगोधन यात्रा बघण्यासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलीवर जंगलात पाशवी अत्याचार करण्यात आला. याप्रकरणी आरोपी कैलास सूर्यभान आत्राम (२८, रा. आवळगाव, ता. मारेगाव) यास पोलिसांनी अटक केली.

यात्रेत शेकडो लोक सहभागी झाले होते. त्यामुळे पोलिसांचाही मोठा बंदोबस्त होता. पीडित अल्पवयीन मुलगी पांढरदेवी जवळच्या एका गावातून आपल्या तीन मैत्रिणीसह आली होती. गर्दीमुळे चारही मैत्रिणींमध्ये ताटातूट झाली. पीडित मुलगी मैत्रिणीचा शोध घेत असतानाच आरोपी कैलास याने तिला मैत्रिणीचा शोध घेण्याच्या बहाण्याने गर्दीपासून दूर नेले. मुलीने मदतीसाठी आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला मात्र आरोपीने तिचे तोंड दाबून गावालगतच्या जंगलात ओढत नेले व तिथे तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. अखेर मुलीने संधी साधून त्याच्या तावडीतून पळ काढला व गावात पोहचून काकांना घडलेली घटना सांगितली. त्यांनी तिच्या आई, वडिलांना माहिती दिली. आई, वडिलांनी मारेगाव पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पीडित मुलीला आरोपीचे नाव माहीत नव्हते. केवळ, तो गावात येत असल्याने चेहरा ओळखीचा होता. मुलीने सांगितलेल्या वर्णनावरून पोलिसांनी अवघ्या काही तासात आरोपीला अटक केली.

नीलेश घायवळचे पारपत्र रद्द

कोथरूड गोळीबार प्रकरण; पोलिसांच्या पत्रानंतर कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : कोथरूड गोळीबार प्रकरणातील आरोपी, परदेशात पसार झालेला गुंड नीलेश घायवळ याचे पारपत्र रद्द करण्यात आले आहे. घायवळला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी 'इंटरपोल'शी संपर्क साधला असून, त्याला ब्ल्यू कॉर्नर नोटीस बजाविण्यात आली आहे.

'पुणे पोलिसांनी घायवळचे पारपत्र रद्द करण्यासाठी पारपत्र कार्यालयाला पत्र दिले होते. त्यानुसार पारपत्र कार्यालयाने त्याचे पारपत्र रद्द केले,' अशी माहिती परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली. घायवळ टोळीतील गुंडांनी १७ सप्टेंबर रोजी कोथरूड भागातील एका तरुणावर गोळीबार केला होता, तसेच एका तरुणावर कोयत्याने वार करून दहशत माजविली होती. या प्रकरणात घायवळ टोळीतील गुंडांना अटक करण्यात आली होती. याप्रकरणी घायवळ, त्याचा भाऊ सचिन याच्यासह साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

घायवळचा शोध घेण्यात आला, तेव्हा घायवळने 'घायवळ'ऐवजी 'गयावळ' या नावाने बनावट कागदपत्रांच्या आधारे पारपत्र काढून युरोपात पलायन केल्याची माहिती तपासात मिळाली. घायवळचा मुलगा लंडनमध्ये शिक्षण घेत असल्याचीही माहिती आहे. घायवळचा भाऊ सचिनही 'मकोका' कारवाईनंतर पसार झाला असून, त्याचाही ठावठिकाणा लागलेला नाही.

INDEL MONEY

Corporate office: **Indel Money Limited**
IIIrd Floor Indel House, Changampuzha Nagar, South Kalamassery, Ernakulum -682033
PH: 0484-2933999 E:customercare@indelmoney.com

GOLD AUCTION NOTICE

निर्दिष्ट आश्वासन आणि आम जनतेस याद्वारा अधिसूचीत करण्यात येते की, खालील खात्यात तारण असलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या जाहीर लिलावाचे आयोजन खालील शाखांमध्ये 24-11-2025 रोजी स. 11:00 वा करण्यात येणार आहे. आम्ही कसूरदार ग्राहकांच्या, जे विविध पत्रव्यवहाराद्वारा अधिसूचीत करून सुद्धा तो / ती कर्ज रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करीत आहोत. लिलाव न केलेल्या बाबींचा स्थळ व तारखेत बदल केल्याची कोणतीही पुढील सूचना न देता अन्य कोणत्याही दिवशी लिलाव करण्यात येणार आहे आणि सदर बाबत माहिती कोणतीही पुढील सूचना न देता संबंधित शाखांकडे प्रस्तुत करण्यात येणार आहे.
वर्धा-36804300000672, 0430/00749

जर आम्ही अधिसूचीत तारखे दिवशी लिलाव पूर्ण करू शकलो नाही, तर सदर लिलावाचे आयोजन श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेड (एसएएमआयएल) द्वारा https://gold.samil.in या त्यांच्या ऑनलाईन ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरून किंवा ई-प्रोक्युअरमेंट टेक्नोलॉजीस लिमिटेड (ऑक्शन टायगर) द्वारा https://egold.auctiontiger.net या त्यांच्या ऑनलाईन ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरून, दि. 26-11-2025 रोजी दु. 12.30 ते दु. 3.30 दरम्यान करण्यात येणार आहे. कृपया नोंद घ्यावी की, जर 26-11-2025 रोजी ई-लिलाव पूर्ण होवू शकला नाही तर सदर लिलावाचे आयोजन त्याच शर्ती व अटींवर कामकाजाच्या नंतरच्या दिवशी पुन्हा करण्यात येणार आहे.

प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे, इंडेल मनी लिमिटेड

NOTICE

NOTICE is hereby given that the Certificate(s) for 60 bearing Equity Share Certificates No(s) 13225 and Distinctive Nos. 30482603-30482662 under the folio No 03860710 of UltraTech Cement Limited standing in the name(s) of Pradeep Tukaram Talmale and Tukaram Fagoji Talmale(deceased), jointly holding has/have been lost or mislaid and the undersigned has/have applied to the Company to issue duplicate Certificate(s) for the said shares. Any person who has any claim in respect of the said shares should write to our Registrar, KFin Technologies Limited, Selenium Tower B, Plot 31-32, Gachibowli, Financial District, Hyderabad-500032 within one month from this date else the company will proceed to issue duplicate Certificate(s).

Date: 05/09/2025
Place: Nagpur

PRADEEP TUKARAM TALMALE
(surviving shareholder)
TUKARAM FAGOJI TALMALE (deceased)
Name(s) of Shareholder(s)

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

बिलासपूर विभाग
वाणिज्य शाखा
अभिरुची अभिव्यक्ती (EOI) आमंत्रित करण्याची सूचना

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूर विभाग विविध अमृत भारत स्थानकांवर बहु-कार्यात्मक संकुल (Multi-Functional Complexes - MFCs) च्या व्यावसायिक विकास, संचालन आणि देखभालीसाठी इच्छुक आणि पात्र एजन्सी, विकासक आणि ऑपरेटरकडून अभिरुची अभिव्यक्ती (EOI) आमंत्रित करत आहे.

अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत, बिलासपूर विभागातील सर्व अमृत भारत स्थानकांच्या मंजूर मास्टर प्लॅनमध्ये विविध व्यावसायिक विकास क्षेत्रे ओळखली गेली आहेत. प्रवाशांच्या आणि जवळच्या रहिवाशांच्या गरजा लक्षात घेऊन प्रवासी सुविधा, किरकोळ बाजार, आतिथ्य, कार्यालय आणि मनोरंजन सुविधांचा समावेश असलेल्या बहु-कार्यात्मक संकुलांच्या विकासासाठी या क्षेत्रांचा वापर केला जाईल. या प्रकल्पांचे उद्दिष्ट म्हणजे स्टेशन संकुलांना आधुनिक **'सिटी सेंटर'** स्वरूपात विकसित करणे ज्यामध्ये खरेदी, मनोरंजन, बैठक, निवास आणि विश्रांती सुविधा उपलब्ध आहेत.

या EOI मध्ये खालील स्थानके समाविष्ट आहेत: बिलासपूर, अकलतारा, जांजगीर-नैला, चांपा, बरद्वार, रायगड, बेलपहार, हिमगीर, ब्रजराजनगर, कोरबा, उस्लापूर, पेंड्रा रोड, अनुपपूर, शहडोल, उमरिया, बैकुंठपूर, बिजुरी आणि अंबिकापूर.

इच्छुक पक्षांकडून खालील गोष्टींसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत:
1. रेल्वेने विकसित केलेल्या **बहुउद्देशीय संकुलांचे संचालन आणि देखभाल, (Operation & Maintenance)** आणि/किंवा
2. **बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा (Built, Operate & Transfer - BOT)** मॉडेल अंतर्गत विकास.

प्रस्तावात स्पष्टपणे खालील गोष्टी नमूद केल्या पाहिजेत: प्रस्तावित स्टेशन आणि क्षेत्राचे वर्णन, प्रदान करायच्या सेवा, कराराचा कालावधी, विकसित करायच्या पायाभूत सुविधा (रेल्वे किंवा अर्जदाराद्वारे), गुंतवणूक मॉडेल, तांत्रिक अनुभव, ऑपरेशनल प्लॅन आणि इतर आवश्यक तपशील.

या **EOI** चा उद्देश इच्छुक पक्षांकडून प्राप्त झालेल्या सूचना आणि प्रस्तावांवर आधारित आगामी RFP/निविदा कागदपत्रे अंतिम करणे आहे.

अधिक माहिती आणि स्पष्टीकरणासाठी, इच्छुक पक्ष बिलासपूर विभागाच्या व्यावसायिक शाखेशी संपर्क साधू शकतात किंवा दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकतात.

EOI प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख: 15.11.2025

EOI प्रस्ताव सादर करण्याचा पत्ता : वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक, वाणिज्य शाखा, डी.आर.एम. कार्यालय संकुल, रेल्वे कॉलनी, बिलासपूर - 495004 (छत्तीसगड)

संबंधित धोरण दस्तऐवज: रेल्वे बोर्ड पत्र क्रमांक **2022/GS/Stn. Dev.-1/08/70** दिनांक 31.01.2023 (भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेशी संबंधित).

वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक,
बिलासपूर विभाग, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

सीपीआर/**10/AM/400**

South East Central Railway @secrail

दक्षिण मध्य रेल्वे

येथे फॉलो करा @SCRailwayindia द.म. रेल्वेच्या निविदा सूचनांचा तपशील आमच्या वेबसाईटवर पाहता येईल: www.scr.indianrailways.gov.in

No. G/C/e-Auction Leasing/2025-26/01
दि.: 23.10.2025

PUB/1335

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, गुंटकल विभाग, दक्षिण मध्य रेल्वे **https://www.ireps.gov.in**च्या माध्यमाने 18 वर्षांहून अधिक वय असलेल्याभारतीय नागरिकांकडून तसेच भारतात नोंदणीकृत असलेल्या कंपनी / फर्म्सकडून बंदिस्त समाप्ती ई-निविदेच्या स्वरूपात ई-निविदा मागवीत आहेत.

अ. क्र.	ई-निविदा क्र.	श्रेणी	कॅटलॉग मधील ठिकाणे	निविदा बंद होण्याचा दिनांक	समाप्तीची वेळ
1	GTLVPH-2526-C1	वीपीएच चे लिझिंग	1 ट्रेन 01 वीपीएच	10.11.25	11:00
2	GTLSLR-2526-C1	एसएलआर चे लिझिंग	18 ट्रेन 20 एसएलआर	11.11.25	10:30

इच्छुकांना तसेच कंत्राटदारांना विनंती आहे की त्यांनी ई-निविदेची प्रक्रिया समजून घेण्यासाठी तसेच त्यात सहभागी होण्यासाठी आयआरईपीएस च्या होम पेजवरील डाव्या नॅविगेशन बार येथे उपलब्ध असलेल्या लर्निंग सेंटर (युजर मॅन्युअल) लिंक द्वारे वापरकर्ता पुस्तिका डाउनलोड करून ते वाचून घ्यावे. तसेच अधिक स्पष्टीकरणासाठी बोलीदार वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, दक्षिण मध्य रेल्वे, गुंटकल यांच्या कार्यालयाशी संपर्क साधू शकतात.

A1682 **वरि. विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, गुंटकल**

हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

HeroHousing Finance

नोंदणीकृत कार्यालय: 09, कम्युनिटी सेंटर, बसंत लोक, वसंत विहार, नवी दिल्ली - 110057, शाखा कार्यालय: फ्लॅट क्र. 403, 4 मजला, शिव गौरव इस्टेट, प्लॉट क्र. 01, भगवाघर लेआउट - पूर्व धरमपेठ, नागपूर, महाराष्ट्र - 440010.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर सूचना (ई लिलाव) [सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 9(1) अंतर्गत]

सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (सुरक्षित धनको) यांच्याकडे गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची सूचना.

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना/प्रतिनिधींना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण ठेवल्या आहेत/शुल्क आकारण्यात आल्या आहेत, ज्याचा ताबा हीरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने (सुरक्षित धनको) घेतला आहे, खाली नमूद केलेल्या कर्जदार, सह-कर्जदार किंवा जामीनदारांकडून थकबाकी वसूल करण्यासाठी **दि. 11 नोव्हेंबर 2025 (ई-लिलाव तारखेला) "जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, जे आहे" आणि "तिथे जे काही आहे"** या तत्त्वांवर विक्री करण्यात येतील. आरक्षित किंमत आणि इसारा ठेव अनामत रक्कम खाली नमूद केली आहे. जाहीर ई-लिलावात सहभागी होण्यासाठी ईएमडी डिमांड ड्राफ्ट/आरटीजीएस/एनईएफटी द्वारे बोली फॉर्मसह करावी, जी दि. 10 नोव्हेंबर 2025 रोजी किंवा त्यापूर्वी सायं. 5.00 वाजेपर्यंत शाखा कार्यालयातः कार्यालय क्र. फ्लॅट क्र. 403, 4 मजला, शिव गौरव इस्टेट, प्लॉट क्र. 01, भगवाघर लेआउट-ईस्टर्न धरमपेठ नागपूर, महाराष्ट्र-440010 येथे हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या अधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करावी.

कर्ज खाते क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार/कायदेशीर वारस/कायदेशीर प्रतिनिधी यांचे नाव	मागणी सूचनेची तारीख /त्या तारखेनुसार रक्कम	ताबा प्रकार (रचनात्मक/ भौतिक अंतर्गत)	आरक्षित किंमत	इसारा ठेव
एचएचएफएनए जीएचओयू22 000026992	मोहम्मद नसीम	दि. 21/08/2024, रु. 38,19,840/- दि. 15/10/2025 रोजीनुसार	भौतिक	रु. 28,35,000/	रु. 2,83,500/-

मालमत्तेचे वर्णन:- प्लॉट क्र. 37, 38, आणि 44, केएच. क्र. 32/2, सिटी सर्वे प्लॉट सीएस क्र. 5844, 5843, 5838, शीट क्र. 30, पीएच.क्र. 39, मौजा बाबुलखेडा, शहर सर्वेक्षण रेकॉर्डनुसार प्लॉट क्र. 120, 137, आणि 119, कॉर्प हाऊस क्र. 420/29, 420/30, आणि 420/37 जुने 240, 245, आणि 252, शीट क्र. 30, मोजमापे **एकूण क्षेत्रफळ 4800 चौ.फूट. एका प्लॉटवर बांधलेल्या इमारतीतील पहिला मजला मोजमापे क्षेत्रफळ 1200 चौ.फुट, नागपूर, महाराष्ट्र-440027 यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, चतुःसीमा खालीलप्रमाणे:-** पूर्व-रस्ता, पश्चिम-प्लॉट क्र. 123 आणि 124, उत्तर-रस्ता, दक्षिण-रस्ता.

अटी आणि शर्ती:
ई-लिलाव https://bankeauctions.com या पोर्टलद्वारे दि. 11-नोव्हेंबर-2025 रोजी (ई-लिलाव तारीख) सकाळी 11.00 वाजल्यानंतर, प्रत्येकी 10 मिनिटांच्या मर्यादित विस्तारासह होईल.
इच्छुक खरेदीदारांनी / बोलीदारांनी ईएमडी रकम आरटीजीएस / एनईएफटी द्वारे किंवा "हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" च्या नावे डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटी द्वारे जमा करणे आवश्यक आहे. ई-लिलाव संपल्यानंतर ईएमडी रकम अयशस्वी बोलीदारांना परत केली जाईल.
ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती:
(1) ई-लिलाव "जसे आहे, जिथे आहे, आधारावर" आणि "जसे आहे, जे आहे, आधारावर" आणि "तिथे जे काही आहे, आधारावर" आणि "कोणत्याही आधारशिवाय आधारावर" आणि "ऑनलाइन" पद्धतीने आयोजित केला जाईल. (2) बोली वाढीची रकम रु. 15,000/- (फक्त पंधरा हजार रुपये) असेल. (3) ई-लिलाव मेसर्स सी-1 इंडिया प्रा. लि., यांच्यामार्फत श्री धरणी कृष्णा-9948182222 (हेल्पलाइन क्र.): सपोर्ट लँडलाइन क्र. +91 124 4302020/2021/2022/2023/2024 | सपोर्ट मोबाईल क्र.: +917291981124/25/26 आणि support@bankeauctions.com /andhra@c1india.com यावर ई-मेल करा) त्यांच्या वेब पोर्टल "३३रु२://ह्रि'ई्ष्ठ:ह्ल२ूं३ यावर केला जाईल. (4) मालमत्तेवर कोणताही भार नाही, जो सुरक्षित धनको यांच्या मालमत्तेच्या माहितीत आहे. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी, भार, लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे टायटल आणि मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/देयके याबद्दल स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. सदर या संदर्भात, ई-लिलावाची जाहिरात हीरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांची कोणतीही वचनबद्धता किंवा कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही आणि ती मानली जाणार नाही. (5) अधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही तृतीय-पक्षाच्या दाव्यांसाठी / हक्कांसाठी / देय रकमेसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. विक्री ही सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,2002 अंतर्गत नियम/शर्ती/निर्धारित केलेल्या अधीन असेल. ई-लिलावाच्या इतर अटी आणि शर्ती खालील वेबसाइटवर प्रकाशित केल्या आहेतः www.herohousingfinance.com. (6) मालमत्तेच्या तपशीलांसाठी आणि मालमत्तेला भेट देण्यासाठी, श्री. अमर सातपुते/9028734375/amar.satpute@herohfl.com आणि शेखर सिंग/9711522275/ shekhar.singh@herohfl.com यांच्याशी संपर्क साधा. (7) संभाव्य बोलीदार दि. 04-नोव्हेंबर-2025 रोजी सकाळी 11.00 वा. ते दुपारी 2.00 वा. या वेळेत पूर्व अपॉइंटमेंट घेऊन मालमत्तेची तपासणी करू शकतात.

कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारे यांना 15 दिवसांची विक्री सूचना

वर उल्लेख केलेल्या कर्जदार/गहाणखतदार/जामीनदारांना कलम 13(2) अंतर्गत मागणी सूचनेत नमूद केलेली रक्कम लिलावाच्या तारखेपूर्वी तारखेनुसार व्याज आणि खर्चासह भरण्याची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा मालमत्तेचा लिलाव केला जाईल आणि उर्वरित देणी, जर असतील तर, तुमच्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल केली जातील.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (सुरक्षित धनको) यांच्या वेबसाइटवर, म्हणजेच www.herohousingfinance.com यावर https://uat.hero-homefinance.in/hero_housing/other-notice यामध्ये दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

दिनांक: 25-10-2025
ठिकाण: नागपूर/आरओएम

हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्यासाठी
अधिकृत अधिकारी
श्री. अमर सातपुते, मोबाईल-9028734375
ईमेल: amar.satpute@herohfl.com

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय: 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22, के.जी. मार्ग, नवी दिल्ली- 110001, फोन: 011-23357171, 23357172, 23705414, वेब.: www.pnbhousing.com
शाखा कार्यालय: 1ला मजला, अचराज टॉवर 2, छिंदवाड़ा रोड, छावनी स्क्वेअर, सदर, नागपूर - 440001

तारखेनुसार सुधारितनुसार सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3(1) सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या प्रकरण 3 च्या कलम 13(2) अंतर्गत सूचना

आम्ही, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (यापुढे "पीएनबीएचएफएल" म्हणून संदर्भित) आमच्या नागपूर कार्यालयाने, 1ला मजला, अचराज टॉवर 2, छिंदवाड़ा रोड, छावनी स्क्वेअर, सदर, नागपूर - 440001 येथे स्थित यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे "कायदा" म्हणून संदर्भित) च्या प्रकरण 3 च्या कलम 13(2) अंतर्गत डिमांड नोटीस जारी केली होती. हप्ते/व्याज न भरल्यामुळे तुमचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया/नॅशनल हाऊसिंग बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स म्हणून वर्गीकृत केल्यामुळे तुम्हाला खाली नमूद केलेल्या सर्व कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना आमच्या अधिकृत अधिकाऱ्यामार्फत सदर ही मागणी नोटीस जारी करण्यात आली आहे. त्यातील